महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

**पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,**
**नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर**

**दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**
**Email ID : collectorpalghar@gmail.com**

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) मा.भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२०-DM-१(A) दि.१४/०४/२०२०
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक - No:DMU/२०२०/ CR.९२/DisM-१/दि.१३/०४/२०२० व दि.१५/०४/२०२०.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक - No:DMU/२०२०/ CR.९२/DisM-१/दि.१७/०४/२०२०.
७) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/Incident Commander/कावि-७३८ दि.१९/०४/२०२०.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक - No:DMU/२०२०/ CR.९२/DisM-१/दि.२१/०४/२०२०.

जिल्हाधिकारी पालघर जिल्हा पालघर

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/लॉकडाऊन.सुटवमनाईआदेश/कावि-८७४ /२० दि.२२/०४/२०२०

## आदेश

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्या अर्थी, करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.४ व ५ अन्वये केंद्र शासनाने व राज्य शासनाने राज्यामध्ये लॉकडाऊन दि.०३/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे.

आणि ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र.६ व ८ च्या आदेशान्वये शासनाने लॉकडाऊन कालावधीत दि.२०/०४/२०२० पासून सुरु करावयाच्या व बंद ठेवावयाच्या बाबीं संदर्भात आदेश पारीत केले आहेत.

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.७ अन्वये उपोद्घातातील अ.क्र.६ व ८ अन्वये कार्यवाही करणेकामी संबंधित तालुक्याचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना Incident Commander घोषित केले आहेत.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व उपोद्घातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसुचनेतील निर्देशान्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेल्या अधिकाराचा वापर करुन तसेच उपोद्घातातील अ.क्र.६ मधील शासन आदेशानुसार पालघर जिल्हयामध्ये पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१) उपोदघातातील अ.क्र.६ दि.१७/०४/२०२० रोजीच्या आदेशान्वये नमुद केलेल्या सुचना पालघर जिल्हयातील मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रास म्हणजेच वसई व पालघर तालुक्यास लागू राहणार नाहीत.
२) पालघर जिल्हयातील उर्वरीत ६ तालुक्यांना उपोद्घातातील अ.क्र.६ व ८ चे आदेश लागू राहतील.
३) कोव्हीड-१९ संदर्भाने महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १७/०४/२०२० च्या आदेशान्वये कोव्हीड १९ च्या प्रतिबंधात्मक उपाय योजना(Measures to be taken for Containment of covid १९) च्या अंमलबजावणी करीता पालघर जिल्हयामध्ये पासेससाठी खालील प्रमाणे व्यवस्था करणेत आलेली आहे.